# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे-४११ ००१

Web:www.dhe.in E-Mail:vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७ २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्रमांक -युएनआय/कॅस/यचममुवि/२०१८/विशि-१ दिनांक - १०/१/१८

23 JAN 2018

आदेश-

पुढील आदेश होईपर्यंत शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एनजीसी/१२८०/१२२४/विशि-४ दिनांक २७/२/८९ व शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एनजीसी/१२९८/४६/४९/विशि-४ दिनांक ११/१२/९९ नुसार अकृषी विद्यापीठातील अधिव्याख्यात्यांना करिअर ॲडव्हान्समेंट योजना लागू करण्यात आलेली आहे. सदर आदेशामध्ये तसेच शासन निर्णय क्रमांक एनजीसी/१२००/७३३९३/१५/२०००/विशि-४, दिनांक १३/६/२००० व दिनांक २४/८/२००० च्या आदेशातील तरतूदीमधील अटीच्या अधीन राहून खालीलप्रमाणे नमूद केलेल्या अधिव्याख्यात्यांना वरिष्ठश्रेणी ( १००००-३२५-१५२००) आणि निवडश्रेणी (१२०००-४२०-१८३००) मध्ये स्थाननिश्चिती देण्याबाबत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांनी शिफारस केली आहे.

### यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

| अ.क्र. | अध्यापकाचे नांव | प्रथम नेमणूक दिनांक | वरिष्ठश्रेणीतील दिनांक( १००००-३२५-१५२००) | निवडश्रेणीचा दिनांक (१२०००-४२०-१८३००) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | |
| १ | श्री. प्रमोद लक्ष्मण खंदारे | २९/०२/१९९२ | २७/७/१९९८ | २७/०७/२००३ |

मा.कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांनी महाराष्ट्र विद्यापीठाच्या अध्यादेश क्रमांक ११ नुसार तसेच शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक एसयुके २०११/(५५४/११)/विशि-१, दि-३०.०१.२०१२ नुसार समिती स्थापन केलेली होती. सदर समितीची दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी झालेल्या निवड समितीच्या बैठकीत वरिष्ठश्रेणी ( १००००-३२५-१५२००) आणि निवडश्रेणी (१२०००-४२०-१८३००) मध्ये निवड समितीने शिफारस केलेली आहे. सदर शिफारसीनुसार वर नमूद केलेल्या अधिव्याख्यात्यांस त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्रमांक ४ मधील दिनांकापासून अधिव्याख्याता पदावरुन वरिष्ठ अधिव्याख्याता श्रेणीतील स्थाननिश्चितीस तसेच रकाना क्रमांक ५ मधील दिनांकापासून निवडश्रेणीतील स्थाननिश्चितीस मंजुरी देण्याबाबत

कुलसचिव कार्यालय
आवक क्र.: GOV.1462
दिनांक: 24/01/2018

मा.शिक्षण संचालक(उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अधिव्याख्यात्यांना वरिष्ठश्रेणीमध्ये व निवडश्रेणीमध्ये स्थाननिश्चितीस मंजुरी देण्यात येत आहे.

वर नमूद केलेल्या अधिव्याख्यात्यांना वरिष्ठश्रेणीस तसेच निवडश्रेणीच्या स्थाननिश्चितीच्या दिनांकापासून त्यांची वेतननिश्चिती विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण पुणे यांचेकडून करुन घेऊन त्याची पडताळणी वरिष्ठ लेखा परीक्षक उच्च शिक्षण पुणे यांचेकडून करुन घेण्यात यावी.

या आदेशान्वये करिअर ॲडव्हान्समेंट योजनेनुसार अधिव्याख्यात्यांना वरिष्ठश्रेणीत स्थाननिश्चिती देण्यात आल्यानुसार सदरहू सहा.प्राध्यापक ज्या वेळेस सेवानिवृत्त किंवा सदर पदाचा राजीनामा देतील किंवा सदरचे पद सोडून जातील त्यावेळेस त्यांचे मूळ सहाय्यक प्राध्यापकाचे पद रिक्त होईल. त्यानुसारच विद्यापीठाने सदरचे पद भरण्याबाबतची कार्यवाही करावी. या अटीचे तंतोतंत पालन करावे. तसेच वर नमूद केलेल्या सहा.प्राध्यापक यांना करिअर ॲडव्हान्समेंट योजनेंतर्गत जरी पदोन्नत्या देण्यात आल्या असल्या त्यांचा मूळ कार्यभार हा सहाय्यक प्राध्यापक पदाचाच राहील.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य पुणे-१.

प्रत-

१. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक (सोबत मूळ सेवापुस्तक जोडले आहे).
२. विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण, पुणे.
३. वरिष्ठ लेखा परीक्षक उच्च शिक्षण अनुदाने, पुणे विभाग.
४. निवड नस्ती.